प्रहार
शब्दांना सत्याची धार
बुधवार, २६ जून २०१३
www.prahaar.in

# मूत्रपिंड प्रत्यारोपणाच्या पाच शस्त्रक्रिया यशस्वी



■ प्रथमच एकाच वेळी 'स्वॅप' पद्धतीचा वापर

■ महाराष्ट्र, राजस्थानमधील रुग्णांना जीवदान

▶ मुंबई *(प्रतिनिधी)*

मूत्रपिंड (किडनी) प्रत्यारोपणाच्या तब्बल पाच शस्त्रक्रिया 'स्वॅप' पद्धतीने एकाच वेळी करण्यात आल्या. मुंबईत प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात शस्त्रक्रिया झाल्या. ४० तज्ज्ञ डॉक्टरांनी हिंदुजा, बॉम्बे हॉस्पिटल आणि हिरानंदानी रुग्णालयात प्रत्येकी दोन टप्प्यात या शस्त्रक्रिया यशस्वी केल्या. मूत्रपिंड निकामी झाल्याने शेवटच्या टप्प्यात आयुष्य जगत असलेल्या ५ रुग्णांना त्यामुळे जीवदान मिळाले.

आजही भारतात अवयवदानाबाबत हवी तशी जनजागृती नसल्याने अजूनही कित्येक जण विविध अवयवांच्या प्रतीक्षेत आहेत. खासकरून मूत्रपिंड प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रियांकरता नातेवाइकांना मोठे अडथळे पार करावे लागतात. असेच महाराष्ट्र आणि राजस्थानमधील पाच कुटुंब मूत्रपिंड प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत होती. राजस्थानमधील एका पित्याने आपल्या मुलीकरता तर महाराष्ट्रातील तीन महिलांनी त्यांच्या पतीकरता मूत्रपिंड दान केले. तसेच एकाने पत्नीसाठी मूत्रपिंड दान केले. त्यांचे रक्तगट जुळत नसल्याने अखेर डॉक्टरांनी मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी स्वॅप पद्धतीचा अवलंब केला.

'डोमिनो ट्रान्सप्लान्ट' पद्धतीने या प्रत्यारोपणाकरता रुग्ण आणि किडनीदाता यांना 'मॅच' केले. 'ॲपेक्स स्वॅप' पद्धतीने रजिस्ट्रीच्या माध्यमातून हे 'मॅचिंग' झाले. यात 'अ' रुग्णांचा नातेवाईक 'ब' रुग्णाला मूत्रपिंड देतो आणि त्याचा नातेवाईक 'क'ला मूत्रपिंड दान करतो. तर 'क' चा नातेवाईक हा 'अ'ला मूत्रपिंड देतो. अशा पद्धतीने या प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया झाल्याचे डॉ. श्रीरंग बच्छू यांनी सांगितले.

एकाच वेळी पाच रुग्णांवर अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया सुरू होत्या. पहिल्यांदाच स्वॅप पद्धतीने मूत्रपिंड प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया यशस्वी पार पडल्या आहेत. मूत्रपिंडांच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांसाठी 'ॲपेक्स स्वॅप ट्रान्सप्लान्ट रजिस्ट्री'मध्ये मोफत नोंद केली जाते.

संबंधित रुग्णांना एखादी किडनी मॅच झाली तर डॉक्टरांना माहिती दिली जाते. गेल्या १८ महिन्यांत अशा ९५ रुग्णांची नोंद झाली आहे. तर ३० स्वॅप ट्रान्सप्लान्ट झाले असल्याचेही डॉ. बच्छू यांनी सांगितले.